माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.८६२/२४/त.क्र.६६/२५/०१

**श्री. राजेंद्र महादेव जाळगांवकर**
रा.ठी. शुक्लेदु हौ. सो. ली.बी. नं. १६५/अ
रुम नं. ५१८३ कन्नवार नगर क्र.१
विक्रोळी (पू) ४०००८३

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा संचालकांचे लिपिक मुंबई विकास विभाग**
मुंबई विकास विभाग चाळी यांचे कार्यालय, सावली इमारत,
गणपत जाधव मार्ग, वरळी मुंबई-४०००१८

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक मुंबई विकास विभाग**
मुंबई विकास विभाग चाळी यांचे कार्यालय, सावली इमारत,
गणपत जाधव मार्ग, वरळी मुंबई-४०००१८

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १६.०९.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर तक्रार अर्जावर आज दि.१६.०९.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा संचालकांचे लिपिक व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक अनुपस्थित आहेत.

तक्रारदार यांनी असे विशद केले की, मूळ जोडपत्रात मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नाही.

या तक्रार संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारदार श्री. राजेंद्र जाळगावकर यांनी दाखल केलेल्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम १८ अंतर्गत तक्रार अर्जात दि. २२.०४.२०२४ रोजी सविस्तर आदेश पारित करण्यात आले असून त्यावर प्राधिकरणाने कुठलाही खुलासा सादर केलेला नाही. यावर संबंधित प्राधिकरणाने दि.२०.०६.२०२४ रोजी प्राथमिक खुलासा सादर केला नसून पुढील सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा संचालकांचे लिपिक मुंबई विकास विभाग यांनी व्यक्तीश: हजर राहून त्यांनतर उपरोक्त तक्रारीवर सविस्तर आदेश पारित करण्यात येतील. सदर तक्रार तहकूब करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पुढील सुनावणीस तक्रारदार यांना दिलेल्या माहिती व संबंधित कागदपत्रांसह उपस्थित राहावे. पुढील सुनावणीची तारीख व वेळी स्वतंत्र नोटीसद्वारे कळविण्यात येईल.

**अंतरिम आदेश**

**वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांना कार्यवाही करावी.**

State Information Commission Maharashtra

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.०९.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**